

30/12/2019 - अग्रणी महाविद्यालय योजना,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यावतीने "राष्ट्रीय सेवा योजना -एक राष्ट्रीय चळवळ"या विषयावर मार्गदर्शन करताना मा. प्रा. एम. एम. कांबळे (इचलकरंजी)



जनमत सर्वसामान्यांचे

## राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची - प्रा. डी.जी. चिगळीकर

हुपरी, दि. ३१ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची चळवळ आहे. या चळवळी मधूनच उद्याच्या भारताचा भावी जबाबदार नागरिक तयार होणार आहे असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा. डी.जी.चिगळीकर यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेच्या चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयामध्ये अग्रणी महाविद्यालय , शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना एक राष्ट्रीय चळवळ या कार्यशाळेचे उद्घाटन व बीजभाषण प्रसंगी बोलत होते .यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या सौ. पी.बी.पाटील ह्या होत्या.

राष्ट्रीय सेवा योजना ही भारतातील महाविद्यालयामध्ये एक युवा चळवळ म्हणून राबवले जाते .राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांवर बुद्धीचे तसेच श्रमाचे संस्कार घडवले जातात. सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांकडून केले जाते.असे मत प्रा.डी.जी.चिगळीकर यांनी व्यक्त केले. सदर कार्यशाळा तीन सत्रात पार पडली द्वितीय सत्रात प्रा. एम. एम.कांबळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना आणि पर्यावरण पूरक युवक या विषयावर मार्गदर्शन केले. तृतीय सत्रात सौ. कल्पना रावजाधव यांनी राष्ट्रीय सेवा योजना आणि महिला सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे संयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीमती एस.जे.माने , कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बी.एस.गिरी यांनी केले. यावेळी उपप्राचार्य प्रा.सुनिल चंदनशिवे , प्रा .श्रीमती डॉ. एस. बी. खोले ,प्रा.समाधान बनसोडे , प्रा.दिपक गोंडके ,प्रा.किरण मजलेकर ,प्रा. अक्षय रेडेकर अदिसह शिक्षक , विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन प्रा.सौ.सारिका मोरे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.डॉ. डेड एम कदम यांनी केले तर आभार कार्यक्रम अधिकारी श्रीमती एस.जे.माने यांनी मानले

[redacted]